"गरीब म्हणून जन्माला येणे हे वाईट नव्हे परंतु गरीब म्हणून मरणे वाईट आहे" असे म्हणणारे स्वत:बरोबर इतरांनाही श्रीमंत करावं, त्यांच्या गरीबीवर हसण्यापेक्षा त्यांना श्रीमंत कसं करता येईल यासाठी प्रयत्न करणारे आणि त्यासाठी लागणाऱ्या विविध गोष्टींची ओळख लोकांना करून देणार व्यक्तीमत्व म्हणजेच डॉ.संतोष कामेरकर

**'मला मोठ व्हायचंय!'** या पुस्तकातून कामेरकरांनी मोठं होण्यासाठी लागणाऱ्या अनेक पैलूंचा ऊहापोह करत त्यानी **"मला श्रीमंत व्हायचंय!"** हे नवीन पुस्तक आपल्या हाती दिले आहे. याही पुस्तकातून ते जरी "मला श्रीमंत व्हायचंय!" म्हणतं असले तरी त्यातूनही ते आपल्या सर्वांना श्रीमंत होण्यासाठी लागणाऱ्या गोष्टींची ओळख करून देत आहेत.

संतोष कामेरकर यांचा जन्म १३ मार्च १९७१ साली निसर्गरम्य अशा साखरपा, रत्नागिरी येथे झाला. आई वडिलांचे महत्व ज्यांना आई किंवा वडिल नाही त्यांना खरचं जास्त प्रमाणात कळतं म्हणायला हरकत नाही. लहान वयात वडिलांचे छत्र हरपलेले असले तरी त्यांच्या आईच्या छत्र छायेत आठवीपासूनच कष्टाला सामोरे गेले. लहान असताना भल्या पहाटे पाखरांबरोबर उठून दूध टाकत आयुष्यांतील विविध अडचणींवर यशस्वीरित्या मात करीत बी कॉम पर्यंत शिक्षण पूर्ण केले.

संतोष कामेरकरांनी लहानपणापासूनच एका निश्चित दिशेने प्रवास सुरु केला होता. त्यामुळे महाविद्यालयीन शिक्षणातच व्यवसायाचे बीज रुजले गेले. समाजसेवीची आवड होती त्यामुळे सतत समाज कार्य करत राहिल्यामुळे वाढत्या ओळखीचा भविष्यात त्यांना त्याचा फायदा झाला. कामेरकरांनी स्वत:ला घडविताना कोणतीही संधी वाया जाऊ दिली नाही. वाचनाचा छंद, शाळा-कॉलेजमधून अनेक स्पर्धामधून उत्तम वक्तृत्व यामुळे त्यांच्याकडे व्याख्यानाची शैली निर्माण झाली. आणि त्यातूनच पुढे व्यक्तीमत्व विकासासाठी व्याख्यानाची संधी उपलब्ध होताच त्यांनी लगेच त्या संधीचे सोने केले, आणि व्यक्तीमत्व विकासावर व्याख्याने देण्यास सुरुवात केली आणि समाजासमोर एका नव्या रुपात सामोरे आले आणि त्यातूनच व्यक्तिमत्वाच्या विकासाचा मंत्र साध्या सोप्या भाषेत सामान्यांसमोर ठेवावे या हेतूने त्यांनी त्यांचे विचार **मला मोठं व्हायचंय!, मला श्रीमंत व्हायचंय! व मिशन कामयाबी!** या पुस्तकातून मांडले आहेत. या पुस्तकाला प्रचंड प्रतिसाद मिळाला की त्यांना या पुस्तकाच्या पाच आवृत्ती बाजारात आणाव्या लागल्या.

गेली वीस वर्ष सामाजिक, मार्केटिंग आणि सहकार क्षेत्रात कार्य केल्यानंतर त्यातील अनुभव, ज्ञान, माहिती सर्वांना फायदेशीर व्हावे यासाठी या पुस्तकाच्या माध्यमातून वाचकांसमोर ठेवले आहे. हे करत असताना आजही अनेक सामाजिक संस्था व शाळांमधून कोणत्याही प्रकारचे मानधन न घेता व्यक्तिमत्व विकासाची व्याख्याने देत असतात. एक सुदृढ समाज घडवणे हे आपले कर्तव्य असते या जाणिवेतून ते हे कार्य सातत्याने करीत असतात. एक यशस्वी व्यावसाईकाचे सर्व गुण कामेरकर यांच्यात आहेत म्हणूनच की काय त्यांनी दहा वर्षापुर्वी पनवेल-गोवा हायवेला लागून बांधणवाडी, कर्नाळा येथे एक भव्य जागा घेतली होती. आज त्या जागेवर **एस. के. हॉलीडे** होम उभारले आहे. भविष्यात या ठिकाणी विविध सोयी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्य करीत आहेत.

आयुष्याच्या वळणावर येणाऱ्या प्रत्येक संकटाला तोंड देत आज कामेरकर समाजातील विविध क्षेत्रात सामाजिक कार्य करत आहेत. शिवाय शैक्षणिक क्षेत्रातही अमुलाग्र कार्य केलेले आहे. लेखक म्हणून **" मला**

**मोठ व्हायचंय!"** नी मोठं केलं, तर उद्योजक म्हणून **एस. के. हॉलीडे** होमने प्रसिद्धी व नजिकच्या गावकऱ्यांना काम मिळवून दिल्याचे समाधान दिले.

कामेरकरांनी राष्ट्रीय एकात्मता, आरोग्य, पर्यावरण व साक्षरता अभियान हाती घेतले असून या अभियानातंर्गत शाळा-कॉलेज, गणेशोत्सव मंडळ व सामाजिक संस्थांच्या माध्यमातून जनजागृती करणारी सुमारे **१ लाख पत्रके** आतापर्यंत वाटली आहेत. मराठी, गुजराती, तेलगु व हिंदी भाषेतील ही पत्रके संपूर्ण भारताच्या कानाकोपऱ्यात वाटून आरोग्य संपन्न, पर्यावरणभिमुख व व्यसनमुक्ती देश घडविण्याचा निर्धारही कामेरकरांनी केला आहे.

सर्व सामाजिक आणि शैक्षणिक बांधिलकींना सांभाळत ते आज वैश्य सहकारी बँक लि. मुंबईचे उपाध्यक्ष, आदर्श फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष, वैश्यवाणी समाज ठाणे चे अध्यक्ष, दैनिक न्यायिक लढाचे उपसंपादक, उपभोक्ता संरक्षण परिषद महाराष्ट्राचे उपाध्यक्ष, वैश्यवाणी समाज मध्यवर्ती संस्थेचे युवा अध्यक्ष नुकतीच त्यांची नॅशनल युनिटी कॉन्फरन्स नवी दिल्ली येथील संस्थेच्या सल्लागार पदी नियुक्ती झाली आहे. अशा विविध क्षेत्रातील सामाजिक संस्थेत विविध पदावर संतोष कामेरकर यशस्वीरित्या कामाची धुरा सांभाळत एकेक पाऊल पुढे पुढे टाकत आहेत.बँकिंग क्षेत्रात डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी प्रबंध संस्थेने त्यांची **प्रशिक्षक** म्हणून नेमणूक केली आहे. संतोष कामेरकरांच्या यशामागे त्यांची आई वनिता कामेरकर व पत्नी श्रद्धा कामेरकर यांचे सहकार्य आहे. त्यांचे हात सतत कोणत्याही कामात मदत करण्यासाठी पुढे येतात. संतोष कामेरकर आई व पत्नीच्या या पाठिंब्यामुळेच मी सर्व काही करू शकलो आणि करीत आहे असे आवर्जुन सांगत असतात. ते आज सर्व युवकांना, समाजाला सांगु इच्छितात की, बदलत्या काळात यशस्वी मार्गक्रमण करताना आपल्या समाजानेही मनात ठेवलेल्या गैरसमजुती, स्वत:ची अल्पसंतुष्ट वृत्ती सोडून श्रीमंत व्हायचा प्रयत्न करायला हवा. आपल्या क्षेत्रात उत्तम करीअर करण्याची सुवर्णसंधी ही आपल्याच हातात असते. तिचे आपण सोने करायला हवे. आज कामेरकर सर्वांना सांगु इच्छितात की स्वप्न कधीच बंद डोळ्यांनी बघु नका. स्वप्न उघड्या डोळ्यांनी बघा, उघड्या डोळ्यांनी बघितलेले स्वप्न नक्कीच साकार होतात. स्वप्नाशिवाय माणूस मोठा होत नाही.

संतोष कामेरकर करीत असलेल्या विविध कार्याचा गौरव नेहमीच होत असतो. त्यांचा गौरव हा त्यांचा गौरव नसुन त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव आहे. त्यांना विविध सामाजिक संस्थेतर्फे वेगवेगळे पुरस्कारही मिळालेले आहेत. महाराष्ट्र पत्रकार संघाचा समाजश्री पुरस्कार, तर दिल्लीत मा. प्रतिभाताई पाटिल, मा. राज्यपाल कांता प्रसाद यांच्या उपस्थितित **"प्राईड ऑफ इंडिया",** केंद्रीय मंत्री सुलतान अहमद यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे **ग्लोबल युथ लिडरशीप अवार्ड, राजीव गांधी राष्ट्रीय एकता सन्मान** तसेच परदेशात लंडन येथे **"स्वार्ड ऑफ ऑनर"** या पुरस्काराने सन्मानित केले आहे, महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाचा **समाजभूषण** पुरस्कार उर्जामंत्री सुनील तटकरे, महाराष्ट्र भूषण मंगेश पाडगावकर, रामशेठ ठाकुर यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल त्यांना मिळालेल्या **'सन्माननीय डॉक्टरेट'** पदवीबद्दल समाजातील सर्व थरातून त्यांचे गौरव केले जाते आहे तसेच **मिशन कामयाबी** ह्या व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा ही ते घेत असतात

हरहुन्नरी व्यक्तिमत्व म्हणून दै. लोकमत, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ व यशोगाथा-लोकसत्ता, या प्रसिद्ध वर्तमान पत्रामध्ये कामेरकरांबद्दल आपण ऐकत आलो आहोत.

भिमाशंकर कठारे
लोकसत्ता